# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/3542/2021-22 दि.04/03/2022

संदर्भ :- 1) जा.क्र.मनपा/आस्था/3006/2021-22, दि.05/01/2022 रोजीचा सुधारित प्रत्यायोजन आदेश.
2) जा. क्र.मनपा/आस्था/3540/2021-22, दि.04/03/2022 रोजीचा आदेश.

**सुधारित प्रत्यायोजन आदेश -**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 49 अन्वये, विविध खात्यांचे व विभागांचे प्रशासन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या निरनिराळया प्रकरणात असलेल्या विविध तरतुदीखाली नमुद केलेले आयुक्तांचे अधिकार आणि कर्तव्ये, महानगरपालिका आयुक्तांचे सर्वसाधारण नियंत्रणसापेक्ष उपायुक्त यांचेकडे संदर्भिय आदेशान्वये सोपविण्यात आले होते. सदर आदेशात खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहे.

अ) श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मुख्यालय), यांना संदर्भ क्र.01 च्या आदेशान्वये सोपविण्यात आलेले पदभार कायम राहतील.

ब) श्री. संजय शिंदे, उपायुक्त यांना संदर्भ क्र.01 च्या आदेन्वये सोपविण्यात आलेले पदभार कायम राहतील. तसेच त्यांना खालीलप्रमाणे नव्याने पदभार देण्यात येत आहेत.

1. महिला व बालकल्याण विभाग
2. परवाना विभाग

क) श्री. अजित मुठे, उपायुक्त यांना संदर्भ क्र.01 च्या आदेन्वये सोपविण्यात आलेले पदभार कायम राहतील. तसेच त्यांना खालीलप्रमाणे नव्याने पदभार देण्यात येत आहेत.

1. पशुसंवर्धन विभाग

ड) श्री. रवि पवार, उपायुक्त यांना संदर्भ क्र.01 च्या आदेन्वये सोपविण्यात आलेले पदभार कायम राहतील. तसेच त्यांना खालीलप्रमाणे नव्याने पदभार देण्यात येत आहेत.

1. समाज विकास विभाग (NULM सह)

संबंधित उपायुक्त यांनी वरील विभागांचे कामकाज, वेळोवेळी त्यांना प्रत्यायोजित केलेल्या आयुक्तांच्या वित्तीय व प्रशासकीय अधिकाराच्या मर्यादेत राहून पहावयाचे आहे. वित्तीय बाबींशी निगडीत सर्व प्रस्ताव/प्रकरणे मंजुर करण्यापुर्वी मुख्यलेखाधिकारी व मुख्यलेखापरीक्षक यांची सहमती घ्यावी.

स्थायी समिती, महासभा अथवा केंद्र किंवा राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावयाचे सर्व प्रस्ताव अतिरिक्त आयुक्त व आयुक्तांच्या पुर्व मान्यतेने व मंजुरीनेच पाठविणे बंधनकारक राहिल.

वरीलप्रमाणे संबंधित विभागाचे कामकाज पाहत असताना महानगरपालिका उपायुक्तांनी आपल्या पदावधीत व त्य पदाच्या आधारे पार पडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी, ह्या सर्व





Scanned with CamScanner

प्रयोजनासाठी आयुक्तांनी पार पाडल्या आहेत व केल्या आहेत, असे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 49 नुसार मानले जाईल.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत,

1) अतिरिक्त आयुक्त (1/2)
2) उप-आयुक्त (सर्व)
3) मुख्यलेखापरीक्षक
4) मुख्यलेखाधिकारी
5) खातेप्रमुख/विभागप्रमुख (सर्व)
6) संगणक विभाग (संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता)
7) आस्थापना निवडनस्ती

प्रत माहितीस्तव :-

मा. महापौर, मा. उप महापौर, मा. सभापती, स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता, मा. सभापती, परिवहन समिती

Scanned with CamScanner